# अनुसुचित जाती,जमाती व भटक्या विमुक्तांचा परिमहासंघ

## भूमिका

भारतीय लोकांनी स्वातंत्र्यासाठी केलेल्या अथक आणि क्रांतिकारी संघर्षाची भारतीय संविधान ही फलश्रुती होती. या भारतीय संविधानाच्या निर्मितीची ऐतिहासिक जबाबदारी अनेक वळणे आणि वळसे घेत डॉ . भीमराव आंबेडकर या अस्पृष्य पुढाऱ्यांकडे आली हे सुद्धा एक आश्चर्य होते. केवळ अस्पृश्यच नव्हे तर प्रत्येक भारतीय माणसाचे सर्वोच्च हित साधण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी संविधान सभेत आपले सर्व बौद्धिक कौशल्य पणाला लावले. भारतीय लोकांच्या आशा आकांक्षांचे प्रतिनिधित्व करणारा महान दस्तावेज डॉ. आंबेडकरांनी २६ जानेवारी १९५० रोजी देशाच्या जनतेकडे सुपूर्द केला. याच भारतीय संविधानाला नुकतीच ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत.

७५ वर्षात देशाला एकसंध आणि एकात्म ठेवण्यात भारतीय संविधानाची महत्त्वाची भूमिका राहिली आहे हे निर्विवाद सत्य आहे. परंतु सामान्य माणसाच्या सर्वांगीण उत्कर्षाचा जो महान उद्देश समोर ठेवून डॉ. आंबेडकरांनी हे संविधान देशाला दिले तो उद्देश खरोखरच पूर्ण झाला काय ? समता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि सामाजिक न्याय ही महामूल्ये भारतीय लोकांनी मनापासून स्वीकारलीत काय? समाजातील शेवटच्या माणसापर्यंत संविधानाचे फायदे पोहोचले आहेत काय? या सर्व प्रश्नांची उत्तरे नकारार्थी असतील तर निश्चितपणे समाजातील बुद्धिवाद्यांनी, विचारवंतांनी आणि कार्यकर्त्यांनी यावर चिंतन करण्याची गरज आहे. संविधानाची अंमलबजावणी करणारे लोक खरोखरच वाईट होते एवढ्या पर्यंतच हे चिंतन मर्यादित राहायला नको. तर या चिंतनाचा विस्तार समकालीन प्रश्न सोडवण्यासाठी झाला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संविधानाचे शिल्पकार आहेत म्हणून अनेकांसाठी भारतीय संविधान हा भावनिक विषय असू शकतो. ही भावनिकता टाळून मागील ७५ वर्षाच्या संसदीय लोकशाहीचा आणि संविधानाच्या अंमलबजावणीचा मागोवा आपण घेतला पाहिजे, आपण हे केले तर निश्चितपणे समकालीन अराजकातून आपण काहीतरी मार्ग काढू शकू.

भारतीय संविधान निर्माण होत असतानाच भारतीय संविधानाच्या विरोधकांची संघटित चळवळ सुद्धा या देशात अस्तित्वात आली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, हिंदू महासभा इत्यादी ब्राह्मणवादी संघटना यात आघाडीवर होत्या. कारण पूर्वपार चालत आलेले त्यांचे विशेषाधिकार नष्ट होतील, भारत हे धर्मराज्य नव्हे तर धर्मनिरपेक्ष राज्य निर्माण होईल हीच त्यांची खरी अडचण होती. याच तथाकथित हिंदुत्ववादी संघटनांच्या बगलबच्चांनी आज अवैध रीतीने देशावर वर्चस्व प्रस्थापित केले आहे. भारतीय संविधानाच्या अक्षरशः चिंधड्या करण्याचं दुष्कृत्य हे लोक करत आहेत. देशातील या धर्मांध आणि संविधानद्रोही लोकांची भ्रष्टसत्ता ही भारतीय संविधानाच्या अंमलबजावणीतील सध्याची खरी अडचण आहे. या धर्मांध आणि बहुसंख्याकवादी लोकांना सत्तेतून कसे दूर करता येईल? यासाठी सर्वात जवळचा आणि सोपा मार्ग कोणता? याचीही चाचपणी आपण केली पाहिजे.

जागतिकीकरण, खाजगीकरण आणि कंत्राटीकरणामुळे संविधानातील प्रतिनिधित्वाच्या तत्त्वाला जाणीवपूर्वक खो देण्यात आला आहे. सार्वजनिक क्षेत्राची झपाट्याने विक्री करण्यात आल्याने खाजगी क्षेत्र वाढले आहे. त्यामुळे घटनादत्त आरक्षणाचा अधिकार निरस्त करण्यात आला आहे. याचा परिणाम म्हणून अनुसूचित जातींमध्ये मध्यमवर्ग/ निम्न मध्यमवर्ग निर्माण होण्याच्या प्रक्रियेला खिळ बसली आहे. याचाच दुसरा अर्थ असा आहे की अनुसूचित जातीतील लोकांच्या खिशात पैसा येणे बंद झाले आहे. याचा दुष्परिणाम असा झाला आहे की नोकरदार वर्गांच्या पैशांवर चालणाऱ्या परिवर्तनवादी चळवळी जवळपास ठप्प झाल्या आहेत. त्यामुळे मागासवर्गीयांच्या समाजजीवनात एक प्रकारचा गतिरोध

# अनुसुचित जाती,जमाती व भटक्या विमुक्तांचा परिमहासंघ

निर्माण झाला आहे. आरक्षणाविषयी जाणीवपूर्वक गैरसमज निर्माण केल्यामुळे आरक्षणाच्या लाभार्थ्यांनाच आरक्षणाच्या विरोधात उभं करण्यात आरक्षणाचे, पर्यायाने संविधानाचे विरोधक यशस्वी झाले आहेत. रोजगाराअभावी अनुसूचित जातींच्या अनेक पिढ्या मात्र उध्वस्त होत असल्याचं चित्र आहे. हे भयावह चित्र बदलण्यासाठी आपल्याला काही करता येईल का? याचे चिंतन होणे गरजेचे आहे.

देशातील सर्व संविधानिक संस्था केंद्र सरकारच्या बटिक झाल्या आहेत. संवैधानिक संस्थांचा राजकीय हेतूसाठी गैरवापर करण्याच्या सरकारच्या धोरणामुळे या संस्था प्रचंड बदनाम झाल्या आहेत. सामान्य माणसाच्या मनात या संस्थांबद्दलचा आधार उरलेला नाही. संविधानिक संस्थांचा निष्पक्षपातीपणा प्रश्नांकित झाला आहे. न्यायव्यवस्था सुद्धा याला अपवाद नाही ही गोष्ट सर्वात दु:खद आहे. निवडणूक आयोग जर सरकारचा नोकर म्हणून वावरत असेल तर पारदर्शक आणि मुक्त निवडणुकांची अपेक्षा आपण करू शकत नाही. ही लोकशाहीसाठी पर्यायाने भारतीय संविधानासाठी धोक्याची घंटा आहे. या भीषण वास्तवाचा स्वीकार करण्याशिवाय भारतीय लोकांकडे कुठलाही दुसरा मार्ग नाही, जर तो असेल तर तो मार्ग कोणता? याचा शोध घेणे ही काळाची गरज आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून अनुसूचित जातीचे हक्क संरक्षित करण्याचा जोरकसपणे प्रयत्न केला. काँग्रेसचे पाशवी बहुमत असण्याच्या काळात अस्पृश्यांच्या हक्क आणि अधिकारांसाठी बाबासाहेबांनी प्राणपणाने झुंज दिली. काँग्रेसमधील उजव्या विचारसरणीचे प्रतिनिधी असलेले सरदार पटेल यांच्याशी टोकाचा संघर्ष केला. गांधी हत्येनंतर अस्पृश्यांच्या हक्काची लढाई अधिक कठीण झाली होती. तरी बदललेल्या परिस्थितीत बाबासाहेबांनी अस्पृश्यांसाठी राजकीय आरक्षण मिळवले. या राजकीय आरक्षणाचा लाभ अस्पृश्य वर्गाला होईल, आपले प्रश्न सोडवण्यासाठी अस्पृश्य वर्गांचे प्रतिनिधी संसदेमध्ये आवाज उठवतील ही डॉ. बाबासाहेबांची अपेक्षा फोल ठरली. अथक परिश्रम करून मिळवलेले हे राजकीय आरक्षण सत्ताधारी वर्गांनी कुचकामी करून टाकले. या राजकीय आरक्षणाच्या माध्यमातून अस्पृश्य लोक अनुसूचित जातीचे प्रतिनिधी म्हणून नव्हे तर त्या त्या पक्षाचे प्रतिनिधी म्हणून निवडून जाऊ लागले. त्यामुळे राखीव मतदार संघातून निवडून गेलेले अनुसूचित जातीचे प्रतिनिधी समाजाची नव्हे तर पक्षाची भूमिका विधिमंडळात मांडू लागले. हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मिळवलेल्या राजकीय आरक्षणाचा विपर्यास होता.

राजकीय आरक्षणाच्या संदर्भाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची खालील दोन वक्तव्य मुद्दामहून लक्षात घेतली पाहिजे.

' जिन लोगो को हमारे हित के खातीर हमने संसद भेजा, जीन पर हमे भरोसा है, उन लोगो को क्या अस्पृश्य समाज के हित के लिए संघर्ष नही करना चाहिए ? गांधी से जो मेरा विरोध था, और देश के लोगो का जो विरोध मैने सहा है, उसकी वजह एक ही है. वजह यह है कि अस्पृश्य लोगो के हित मे वो लोग कुछ नही कर सकते. देश के लोगो ने हमारा कहना सुना, हमारी मांगे अगर मंजूर की तो विरोध की या लढने की कोई वजह बाकी नही रहेंगी. लेकिन ऐसा नही होता और हमे लढना पडता है'

# अनुसुचित जाती,जमाती व भटक्या विमुक्तांचा परिमहासंघ

' अस्पृश्य समाज आणि खालच्या जातीचे लोक आपला समूह करून वेगळे राहतात. त्यांचा हिंदू समाजात समावेश केला तरी ते हिंदू समाजाचा अविभाज्य भाग समजले जात नाहीत. जोपर्यंत काही विशेष तरतूद होणार नाही तोपर्यंत त्यांना योग्य प्रतिनिधित्व मिळणार नाही असे वर्षानुवर्षे पिचलेल्या वर्गाला वाटते.'

वरील दोन्ही वक्तव्यावरून लक्षात येईल की, बाबासाहेबांनी अनुसूचित जातीच्या (राजकीय आरक्षणातून) पुढे गेलेल्या प्रतिनिधींनी विधिमंडळात समाजाच्या समस्यांवर संघर्ष केला पाहिजे. अनुसूचित जातीच्या हितांसाठीच आमचा संघर्ष आहे आणि सत्ताधारी पक्षाच्या विरोधात आमचा लढा आहे. अनुसूचित जातीच्या संदर्भात ' विशेष तरतूद' आणि ' योग्य प्रतिनिधित्व' या दोन गोष्टी जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेली ही लढाई आपल्याला लढावीच लागेल. ही लढाई लढण्यासाठी आपण खरोखरच सज्ज आहोत काय ? याची वैचारिक चर्चा सुद्धा झाली पाहिजे.

सार्वजनिक उपक्रम तोट्यात असल्याचे कारण देऊन ते विक्रिसाठी काढण्याचे सरकारचे धोरण मागासवर्गीयांच्या जीवावर उठले हे आपल्याला ज्ञात आहेच. आज आपण जागतिकीकरणाच्या विळख्यात पुर्णतः अडकलेले आहोत. देश म्हणून आपण वैश्विक अर्थकारणाशी थेटपणे जोडल्या गेल्यामुळे आता परतीच्या शक्यता कमी झाल्या आहेत. त्यामुळे खाजगीकरण बंद करून नव्याने सार्वजनिक उपक्रम सुरू करणे अशक्यच झाले आहे. ब्राम्हो- भांडवली सरकार हे करेल अशी शक्यता सुद्धा अजिबात नाही. असे असले तरी खाजगीकरण विरोधी आपली भूमिका नेहमीसाठी कायम राहील. परंतु प्राप्त परिस्थितीशी समायोजन म्हणून सरकारने खाजगीकरणात आरक्षण हे तत्त्व राबवावे. आणि आरक्षणाच्या लाभार्थी असणाऱ्या अनुसूचित जाती-जमाती व इतर मागासवर्गीयांच्या वेतन भत्ते, निवृत्ती वेतन यासाठी कायदा करून त्यांचे जीवनमान उंचावण्याची काळजी घ्यावी. अशी अपेक्षा करायला हरकत नाही. यासाठी दबावगटाचे राजकारण करावे लागेल. समान हक्कांसाठी एकत्र येऊन लढणे अशक्य अजिबात नाही. स्वतः साठी, भावी पिढ्यांसाठी वंचित समूहाला हे करावे लागेल.

आपण सर्व जातीअंताचे पुरस्कर्ते असलो तरी जाती आधारित जनगणना झाली पाहिजे ही आपली मागणी असावी. कारण जोपर्यंत जाती आधारित जनगणना होणार नाही तोपर्यंत ब्राह्मणवादाची निर्मिती असलेल्या जातींची सद्यस्थिती काय आहे हे कळणार नाही. या जनगणनेच्या माध्यमातून अनुसूचित जाती जमाती आणि इतर मागासवर्गीय ( भटक्या विमुक्त जाती जमातींसह) यांचे स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधीमंडळातील प्रतिनिधित्व वाढणार आहे. तद्वतच विविध जाती समूहांची आर्थिक स्थिती सुद्धा लक्षात येणार आहे. त्यामुळे जाती आधारित जनगणना हा समकालीन जन आंदोलनाचा मुख्य मुद्दा होऊ शकतो.

अनुसूचित जातींच्या राजकीय हक्काचा, प्रतिनिधित्वाचा इतिहास समजून घेतला तर आपल्या असे लक्षात येईल की, अनुसूचित जातींच्या राजकीय आरक्षणाच्या संदर्भाने त्या काळी ज्या निवडणूक प्रक्रिया राबवल्या होत्या त्या तत्कालीन परिस्थितीचा दबाव म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मान्य केल्या होत्या. काँग्रेसच्या बहुमताशी संघर्ष करत अनुसूचित जातीसाठी शक्य होईल तेवढे लाभ पदरात पाडून घेणे एवढेच बाबासाहेबांच्या हातात होते. पुणे करारातून उदयाला आलेली निवडणूक पद्धती अनुसूचित जातीवर अन्याय करणारी आहे हे डॉ. आंबेडकरांनी वारंवार स्पष्ट करून सांगितले आहे. आरक्षित जागा, स्वतंत्र मतदारसंघ, संकलित मतदानासहित बहुसदस्यीय मतदारसंघ, राखीव मतदार संघ या सर्वच निवडणूक पद्धतीचा फोलपणा स्पष्ट झालेला आहे.

# अनुसुचित जाती,जमाती व भटक्या विमुक्तांचा परिमहासंघ

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी मागे घेऊन मतदारसंघातील अनुसूचित जातीच्या आणि सवर्ण हिंदूंच्या मतदान झालेल्या मतांची स्वतंत्र मोजणी केली जावी असा आग्रह धरला होता. अनुसूचित जातीच्या उमेदवाराला विजयी घोषित करण्यासाठी त्याला एकूण झालेल्या अधिकृत मतदानापैकी एक तृतीयांश मते मिळावीत याला मान्यता दिली जावी असेही त्यांचे म्हणणे होते. यालाच 'पात्रतायुक्त संयुक्त मतदारसंघ' असे म्हणतात. त्यामुळे डॉ. आंबेडकरांनी सांगितलेला ' पात्रतायुक्त संयुक्त मतदारसंघ' हा एकच मार्ग सध्या उपलब्ध असल्याने याच मार्गाने जाऊन, डॉ. बाबासाहेबांनी प्रतिपादित केलेल्या निवडणूक विषयक कल्पना व्यवहारात उतरवण्याची गरज आहे. हे आपण करू शकलो तर निश्चितपणे सामाजिक आणि राजकीय दृष्ट्या काही सकारार्थी गोष्टी घडून येणार आहेत. व्यक्ती म्हणून, चळवळ म्हणून हे आपले कर्तव्य सुद्धा आहे.

वरील निवेदनावरून काही ठळक मागण्या आम्ही भारताचे राष्ट्रपती महामहीम द्रौपदी मुर्मू यांना सादर करणार आहोत.

1. भारताच्या संविधानाला ७५ वर्ष पूर्ण झाली. या संविधानाचे आपण सारे लाभार्थी आहोत परंतू या देशातील उच्चवर्णीय हिंदूच्या नाकर्तेपणामुळे त्यांनी पुर्वास्पृश्य ,अदिवासी यांना बरोबरीचे मानले नाही व पुणे करारानुसार राजकीय राखीव जागा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्विकारल्या त्या नाईलाजाने. फक्त 10 वर्षांसाठी परंतू उच्चवर्णीय हिंदूनी गांधी, आंबेडकर दोघांशी ही दगाबाजी करीत या राखीव जागाची मुदत वाढवत नेली.या राखीव जागा शिर्डीच्या शेपटासारख्या आहेत. त्यांचा उपयोग सवर्ण हिंदूना लाचारांच्या फौजा उभ्या करण्यासाठी झाला व आम्हाला ग्रामपंचायत ते संसद यामध्ये खरे प्रतिनिधित्व मिळाले नाही. सवर्ण हिंदूनी अस्पृश्याचे, अदिवासींचे पुढारी ठरवले, तर भटक्या विमुक्त जमातींना ते अनुसुचित जाती जमातीपैंकी असूनही त्यांना मोजले नाही. आजचे प्रतिनिधी राखीव जागावर निवडून येतात ते त्यांच्या त्यांच्या पक्षाचे असतात व आमचा खरा एकही प्रतिनिधी कोणत्याच सभागृहात नसतो म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूळ भूमिकेनुसार आम्हाला स्वतंत्र मतदार संघ मिळाले पाहिजेत व संयुक्त मतदार संघातही आम्हाला मतदानाचा अधिकार मिळाला पाहिजे. आमचा दुहेरी मतदानाचा हक्क व आमचे प्रतिनिधी निवडण्याचा हक्क आम्हाला मिळालाच पाहिजे व आवश्यक ती घटना दुरुस्ती करुन स्वतंत्र कायदा झाला पाहिजे.
2. १९९० साली भारतातल्या जनतेला विश्वासात न घेता राज्यकर्त्यांनी खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण हे धोरण स्विकारले. देशाच्या संपत्तीची भांडवलदारांवर उधळण करीत सरकारने लोककल्याणकारी राज्य, घटनेतील मार्गदर्शक तत्वे, भारतीय घटनेचा सरनामा, त्यात सांगितलेली संविधानिक मूल्यं यांना बाजूला सारून खाजगीकरणाचा सपाटा लावला. या खाजगीकरणामुळे अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व भटक्या जमातीं यांचे नोकऱ्यातील रिजर्वेशन गेले.शिक्षण प्रचंड महाग झाल्यामुळे त्यातील राखीव जागाही गेल्या. हे राखीव जागाचे तत्व घटना दत्त आहे. कोणतेही घटनात्मक दुरुस्ती न करता शासनाने नोकर भरती न केल्यामुळे त्या आपोआप संपुष्टात आल्या. त्यामुळे शासनाने पूर्ववत नोकर भरती सुरु करावी. नोकऱ्यातील आमचा बॅकलॉग भरावा आणि कोणत्याही स्वरुपात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, शासनाच्या मदतीने उभ्या राहिलेल्या खाजगी उद्योग धंद्यामध्ये स्वतंत्र कायदा करुन राखीव जागाची तरतूद करण्यात यावी व वेतन ,भत्ते,प्रमोशन,पेन्शन या सर्वांची तरतूद

# अनुसुचित जाती,जमाती व भटक्या विमुक्तांचा परिमहासंघ

देशाच्या तिजोरीतून करावी म्हणजे प्रत्यक्ष काम जरी खाजगी कारखान्यांमध्ये करत असतील तरी त्यांचे मालक सरकारच राहील,यासाठी स्वतंत्र कायदा करण्यात यावा.

3. अनुसुचित जाती जमाती संरक्षण कायदा, भटके विमुक्त नवबौध्द यांना लागू करावा. मूळच्या कायद्यात झालेल्या सर्व दुरुस्त्या रद्द करुन ऍट्रॉसिटी ॲक्ट लागू करावा.
4. वरील सर्व बाबीं पूर्ण व्हायच्या असतील तर देशाने प्रथम जातनिहाय जनगणना करावी व जातींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांना देशाच्या सत्ता,संपत्ती व प्रतिष्ठेमध्ये वाटा मिळावा व त्यासाठी देशाची सत्ता,संपत्ती व प्रतिष्ठा यांचे फेरवाटप करावे.
5. देशातील कोणाही नागरिकाला दोनच वेळा प्रधानमंत्री,राष्ट्रपती,उपराष्ट्रपती,मुख्यमंत्री होता येईल. कोणासही तिसरी टर्म मिळणार नाही यासाठी स्वतंत्र कायदा करण्यात यावा. या सर्व मागण्या मान्य झाल्याशिवाय स्वातंत्र्य,समता,बंधुता,न्याय या संविधानिक नैतिकतेला काहीही अर्थ उरत नाही असे आमचे मत आहे. यासाठी प्रचंड जनआंदोलन उभा करावे लागेल असे आमचे मत आहे.

आपले नम्र,



मा. प्रशांत वंजारे
अध्यक्ष,
भटक्या विमुक्त
जमाती संघटना ,
विदर्भ विभाग .

मा. चेतन शिंदे
संपादक,
द पिपल्स पोस्ट.
औरंगाबाद.

मा. लक्ष्मण माने
अध्यक्ष
भटक्या विमुक्त जमाती संघटना ,
महाराष्ट्र.

**टिप – सदर पत्र विचारवंत, कार्यकर्ते यांच्या माहितीस्तव व सुचनांच्या अपेक्षित.तसेच ज्यांना सक्रिय व्हायचे आहे त्यांनी कृपया संपर्क साधावा.**

**संपर्क क्र.**

1. **मा. लक्ष्मण माने – 9822013236**
2. **मा. प्रशांत वंजारे - 8275808282**